8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# देवमुर्ती परिसरातील जेनेसिस करिअर अकॅडमीबाबत संशयाचे सावट

## जाहिरातींचा सुळसुळाट आणि विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात?

**दीपक शेळके**

**जालना -** शहरातील देवमूर्ती परिसरात सुरू झालेल्या जेनेसिस (जीसीए) करिअर अक्ॅडमीने केलेल्या मोठ्या जाहिरातींमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. केवळ २० हजार रुपयांत पोलीस भरतीची तयारी, १०० एकरची जागा, हॉर्स रायडिंग, स्विमिंग पूल, विविध खेळांची मैदाने, निवासी सुविधा आणि अनुभवी प्रशिक्षक अशी आकर्षक आश्वासने देऊन विद्यार्थी व पालकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, जाहिरातीत सांगितल्यानुसार या सर्व सुविधा खरोखरच उपलब्ध आहेत का, याबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहे.

**जाहीरात आणि वस्तुस्थितीतील तफावत**

अक्ॅडमीने केलेल्या जाहिरातींमध्ये अनेक मोठ्या बाबींचा उल्लेख आहे. पण, प्रत्यक्ष स्थिती वेगळी असल्याचे समोर येत आहे. एका विद्यार्थ्याने जेईईसाठी अडव्हॉन्स ३० हजार रुपये भरले, पण शिकवण्यासाठी शिक्षकच उपलब्ध नव्हते. त्यामुळे आठवड्याभरात त्याला प्रवेश रद्द करावा लागला. पैसे परत मिळवण्यासाठीही त्याला दीड- दोन महिना मोठा संघर्ष करावा लागला आणि अखेरीस त्याला केवळ २५ हजार रुपयेच परत मिळाले. जाहिरातीमधील २० हजार रुपयांचे आश्वासन केवळ एक 'भ्रामक' जाहिरात असून, त्यासोबतच्या 'स्टार' चिन्हामध्ये सर्व अटी व शर्ती दडलेल्या आहेत.

**पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

या अक्ॅडमीच्या जाहिरातीतील एक प्रमुख मुद्दा म्हणजे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस उपनिरीक्षक (PSI) वैशाली एम. गुळवे यांचा उल्लेख. सरकारी सेवेत कार्यरत असताना एखाद्या अधिकाऱ्याला अशा प्रकारे खासगी अक्ॅडमीमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून काम करता येते का, याबाबत नियम काय सांगतात, यावर प्रशासनाने भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी अशा खासगी संस्थांमध्ये काम करणे कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे का, हा प्रश्न आता विचारला जात आहे.

**असुरक्षिततेची भीती आणि सरकारी नियमांचे उल्लंघन**

ही अक्ॅडमी देवमूर्ती परिसरातील एकांत जागेत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या, विशेषतः अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. बीडमध्ये एका कोचिंग क्लासेसच्या शिक्षकावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची घटना ताजी असताना, अशी एखादी अप्रिय घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

या निवासी अक्ॅडमीसाठी विविध सरकारी विभागांची परवानगी घेणे आवश्यक आहे. यात ग्रामपंचायत, शिक्षण विभाग, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, तसेच इमारत निवासी वापरासाठी योग्य असल्याचा दाखला (भोगवटा प्रमाणपत्र) अशा अनेक परवानग्यांचा समावेश असतो. पण, या अक्ॅडमीकडे या सर्व परवानग्या आहेत का, याबाबत शंका आहे. या अक्ॅडमीने बांधकाम परवाना, व्यवसाय परवाना, शिक्षण विभागाची परवानगी, आरोग्य आणि सुरक्षा प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र आदी आवश्यक परवानग्या घेतल्या आहेत का, हे तपासणे गरजेचे आहे.

पालक आणि विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, केवळ जाहिरातींवर विश्वास न ठेवता, अक्ॅडमीतील सर्व सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करावी आणि प्रवेशासंबंधीच्या सर्व अटी व शर्तींची शहानिशा करूनच निर्णय घ्यावा.

एकंदरीत, जेनेसिस करिअर अक्ॅडमीचे उदाहरण हे एक धोक्याचे सूचक आहे. पालक आणि विद्यार्थ्यांनी केवळ जाहिरातींवर विश्वास न ठेवता, प्रत्यक्ष जागेची पाहणी करणे, सर्व सुविधांची खात्री करणे आणि आवश्यक कायदेशीर बाबी तपासणे गरजेचे आहे. या प्रकरणी प्रशासनानेही पुढाकार घेऊन चौकशी करणे आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचे भविष्य अशा फसव्या जाहिरातींच्या जाळ्यात अडकणार नाही.




जीसीए अक्ॅडमीच्या जाहिरातींमध्ये नमूद केलेल्या सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध नसल्याचे स्पष्ट होत आहे. केवळ २० हजार रुपये अशी आकर्षक योजना जाहीर करतांना बाजूला दिलेल्या * चिन्हात महत्त्वाचे अटी-शर्ती दडविण्यात आल्या आहेत. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी अशा जाहिरातींवर आंधळा विश्वास ठेवू नये.

एका विद्यार्थ्याने जेईईसाठी ३० हजार रुपये भरून प्रवेश घेतला होता. मात्र, आठवडाभर अक्ॅडमीत कुणी शिक्षकच हजर नसल्याने वेळ वाया गेला. सुविधा नसल्याचे लक्षात येताच पालकांनी पैसे परत मागितले. सुरुवातीला प्रशासनाने फक्त २० हजार रुपये परत देण्याचे सांगितले. मोठ्या आग्रहानंतर २५ हजार रुपये परत देण्याचे मान्य झाले, परंतु ते देण्यासाठी दीड-दोन महिने वेळ घेतला गेला.

सरकारी कर्मचाऱ्यांचे आचरण नियमानुसार, कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला आपल्या पदावर असताना दुसऱ्या कोणत्याही खाजगी व्यवसायात किंवा नोकरीत काम करण्याची किंवा कोणत्याही खासगी संस्थेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची परवानगी नसते. एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने खासगी संस्थेत काम केल्यास, हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होऊ शकतो. यामुळे त्यांच्या सरकारी कामावर परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच, ते त्यांच्या पदाचा गैरवापर करून त्या खासगी संस्थेला फायदा मिळवून देऊ शकतात. या नियमांमागील मुख्य उद्देश म्हणजे सरकारी कामात पारदर्शकता आणि निष्पक्षता राखणे. म्हणूनच, करिअर अक्ॅडमीच्या जाहिरातीत पोलीस उपनिरीक्षक (PSI) यांचा उल्लेख मार्गदर्शक म्हणून केला असल्याने यावर वरिष्ठांनी चौकशी केल्यास वस्तुस्थिती समोर येईल.

युवा आदर्श

## कुणा तमा ...

अधून मधून डोकेवर
काढत राहे राजीनामा
शांत बसल्या उद्रेकांस
लावायचे पुन्हा कामा
जाणूनि सगळे घडवी
कशाला मागणे क्षमा
चूक मान्य करणे धैर्य
जमते केवळ स क्षमा
रान पेटवत रानोमाळ
सामील करी माध्यमा
फेक न्युज महा ह्युज
खतपाणी घाले संभ्रमा
कॅमेरे सदैव रोखलेले
टिपत रहावे पराक्रमा
सोबत घे समस्त पक्ष
संपूर्ण घडते परिक्रमा
मिडीयावरती विस्तारे
दाखवायचे रे विक्रमा
आश्चर्य उंचावे भुवया
चक्रात टाकते चक्रमा
खरीच केली का चूक
कोण करे खातरजमा
कंठाळ्या बसत राहो
वाजवत रहावे डमामा
बदलू टाकी हवामाना
सद्वृत्ती एक अणिमा
तिमीर क्षणार्धा लोपून
उजळू जिंके पौर्णिमा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## स्त्री बाल रुग्णालयात मुजोरी

### वाघमारेंची सीसीटीव्हीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील स्त्री बाल रुग्णालयात मुजोरी, अरेरावी आणि रुग्णांकडून पैशांची मागणी (चिरिमिरी) करण्याचे प्रकार वाढले असल्याचा गंभीर आरोप ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी केला आहे. रुग्णालयातील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून, राजकीय लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे अधिकारी आणि कर्मचारी मनमानी करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. वाघमारे यांच्या मते, स्त्री बाल रुग्णालयाच्या डिलिव्हरी विभागात डॉक्टर आणि कर्मचारी रुग्णांशी तसेच त्यांच्या नातेवाईकांशी उद्धटपणे वागतात आणि अर्वाच्य भाषेचा वापर करतात गरीब आणि गरजू रुग्णांकडून विविध कामांसाठी पैशांची (चिरिमिरी) मागणी करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाघमारे यांनी थेट स्थानिक लोकप्रतिनिधींवर

**पान २ वर**






## संपादकीय

# साधेपणातही महानता

आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## स्त्री बाल ...

निशाणा साधला. त्यांच्या उदासीनतेमुळेच रुग्णालयातील कर्मचारी आणि अधिकारी कोणालाही न घाबरता मनमानी कारभार करत आहेत, असे ते म्हणाले. या सर्व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी रुग्णालयाच्या प्रत्येक विभागात, विशेषतः डिलिव्हरी विभागात, तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी नवनाथ वाघमारे यांनी केली आहे. सीसीटीव्हीमुळे गैरव्यवहार थांबतील, अशी त्यांची अपेक्षा आहे. या गंभीर आरोपांनंतर जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून या प्रकरणाची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वाघमारे यांनी केली आहे. गरीब रुग्णांना योग्य आणि सन्मानजनक वागणूक मिळावी यासाठी त्यांनी हे पाऊल उचलले आहे.

# हिंदी दिल की धडकन ;मातृभाषा दिल की आवाज

हिंदी भाषा ही देशाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या शिक्षणामध्ये हिंदीला सक्तीची भाषा केलीच पाहिजे. देशात आनंदाची गोष्ट म्हणजे २०१४ पासुन हिंदी भाषेचा प्रसार भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणात होत आहे. युनो सारख्या मोठ्या मंचावर दीवंगत नेता अटल बिहारी वाजपेयी, सुष्मा स्वराज यांनी हिंदी भाषेत आपले विचार मांडुन देशाचा गौरव उंचावला आणि मोदी पंतप्रधान झाले तेव्हा पासुन संपूर्ण भारतात व जगात हिंदी भाषेचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे हि भारताच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची आणि कौतुकास्पद बाब आहे याचं मी मनापासून स्वागत करतो.भारताची राष्ट्रभाषा हिंदी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची जबाबदारी संपुर्ण भारतवासीयांची आहे. देशातील कोणताही व्यक्ती असो त्याला हिंदी भाषेचेज्ञान असायलाच पाहिजे. कारण हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून ओळखल्या जाते. हिंदी भाषा व प्रादेशिक भाषा या प्रत्येकाला येणे व समजने अती आवश्यक आहे. परंतु आताही भारतातील काही दीग्गज नेतागन व सिलेब्रेटी विदेशी दौऱ्यावर जातात तेव्हा इंग्रजी भाषेला खुपच महत्त्व देताना दिसतात हे योग्य नाही. परंतु पर्यायी भाषा म्हणून इंग्रजीचा वापर व्हावयास पाहिजे.भारतीय भाषा बऱ्याच आहेत त्या समृध्दीही आहेत. पण दक्षिणेतील भाषा सम जायला कठीण जातात. हिंदी भाषा लवचिक असल्याने सर्वानाच लवकर समजते व अवगत होते. सर्वच धम र्च्या लोकांना हिंदी भाषेची जान आहे. फक्त दक्षिण भारतातील काही राजकीय पुढारी हिंदी भाषेचा विरोध करतांना दिसतात. ते विदेशी इंग्रजी भाषा बोलायला तयार आहेत. परंतु हिंदी भाषा बोलायला किंवा ऐकायला तयार नाहीत,हे कीतपत योग्य म्हणावे ? भारतात अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती आहेत. परंतु कोणीच आता पर्यंत हिंदीचा विरोध केलेला नाही. फक्त दक्षिणम ध्येच हिंदीचा विरोध होतो.तामि ळनाडुत करुणानिधी यांनी १९६५ मध्ये हिंदी भाषेचाकडाडून विरोध केला होता व त्यावेळेस राज्यात हिंदी विरूद्ध आंदोलन उभारण्यात करूनानिधींचा मोठा वाटा होता. या आंदोलनाला हिंसक वळणसुध्दा लागले होते. शेवटी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशात त्रिभाषा सूत्रसुरूच राहील असे स्पष्ट केले होते व आंदोलन थांबले. हिंदी भाषेचा त्रास ज्यांना आहे त्यांनी आपल्या प्रादेशिक भाषेचा वापर अवश्य करायला हवा. आपण सर्व हिंदुस्थानात रहातो मग सर्वानाच हिंदी भाषा का येऊ नये ?आपण संपूर्ण देशात इंग्रजीभाषा सक्तीची करू शकतो मग हिंदी का नाही? भाषावाद पहाता २०१४ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यानी निर्णय घेतला की केंद्र सरकारमधील सर्व अधिकृत सोशल मीडिया अकाउंट्सवर प्रामुख्याने हिंदीतून ट्विंट करण्यात यावे आणि इंग्रजी ही ऐच्छिक भाषा असेल असे जाहीर केले होते. कारण सर्वानाच हिंदी भाषा अवगत आहे.भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासीत प्रदेश आहेत त्यात जर एकट्या तामिळनाडू सारख्या राज्याचा हिंदी भाषेला आताही विरोध असेल तर ते योग्य नाही. आपली म ूळात इंग्रजी भाषा नाहीच मग इतका इंग्रजीचा उहापोह कशाला? देशाची राष्ट्रभाषा हिंदी आहे.मग सर्वच राज्यात हिंदी हा विषय अनिवार्य का नाही? मी सरकारला आवर्जुन सांगेल की, आपली मातृभाषा (प्रादेशिक भाषा). आपली राष्ट्रभाषा व नंतर इंग्रजी भाषा सर्वच राज्यांत सक्तीची करावी. जो राजकीय नेता राष्ट्रभाषेचा विरोध करेल त्याला दंडीत केलेच पाहिजे. कारण राष्ट्रभाषेचा विरोध करने म्हणजे राष्ट्राचा अपमान करने होय असे मी समजतो. तामिळनाडुम धील अनेक लोक इतर राज्यात नौकरी किंवा व्यवसाय करीत आहेत त्यांना हिंदीची जान आहे मग तामि ळनाडूच्या नेत्यांना हिंदीचा विरोध का? संपूर्ण देशाने हिंदी भाषेची जोपासना करावी त्याच सोबत संपूर्ण राजकीय पक्षांनी हिंदी भाषेचा वापर सर्वात जास्त करावा. संपूर्ण सरकारी कामे प्रादेशिक भाषेत किंवा हिंदीतुनच व्हावयास पाहिजे. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी प्रधानमंत्री होताच करुनानिधी, जयललिता, वायको, उमर अब्दुल्ला यांनी हिंदी भाषेला विरोध केला होता. त्याचबरोबर २०१४ मध्ये जम्मु काश्मिरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला म्हनाले होते की, भारतासारखा खंडप्राय देशात अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात या देशातील धार्मिक आणि भाषिक संस्कृती वेगवेगळ्या प्रकारची आहे अशा परीस्थितीत हिंदीचा अट्टाहास धरता येणार नाही असे त्यांनी त्यावेळेस म्हटले होते.भारतात अधिकृत २२ भाषा असल्या तरी भारतात ५०० हुन अधिक महत्वपूर्ण भाषा आहेत. मग हिंदीला राष्ट्र भाषेचा दर्जा दीलेला आहे त्याचे काय ? आपण स्वातंत्र्यात जगत आहोत त्यामुळे इंग्रजीचा जास्त लाड करने योग्य नाही.आजही प्रत्येक देशाला आपआपल्या राष्ट्रीय भाषेचा अभिमान आहे.त्याचप्रमाणे आपल्याला सुध्दा राष्ट्रभाषेचा अभिम ान असायला हवा.परंतु आजही भारतात इंग्रजीला अधिक जवळ करतात हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. ही बाब सत्य आहे की, २०१४पासुन संपूर्ण भारत हिंदी भाषामय झालेला आहे यात तिळमात्र शंका नाही. २०१४ पासून आजपर्यंत संपूर्ण जगभर हिंदीचा प्रसार सुध्दा होत आहे ही भारताकरीता स्वाभिमानाची आणि गौरवास्पद बाब आहे. परंतु आताही भारतात काही हिंदी विरोधी आहेत त्यांना हिंदीचा पाठपढविने अत्यंत गरजेच आहे. देशात असेही प्रधानमंत्री होवुन गेले की त्यांनी हिंदीचा वापर नाहीच्या बरोबरीने केलेला आहे.त्याचप्रम ाणे आताही अनेक सांसद हिंदी किंवा मातृभाषेचा वापर न करता संसदेत आपले विचार इंग्रजीत मांडतात.याकडे सुध्दा लक्ष वेधले पाहिजे. मनुष्य प्राणी हा बुध्दीजीवी आहे. त्याला सर्वच गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे जगात प्रत्येक देशाच्या वेगवेगळ्या भाषा आहेत. त्याही शिकायला हरकत नाही यांनी ज्ञान वाढते. परंतु मातृभाष आणि राष्ट्रभाषेला विसरता कामा नये ही बाब सर्वानीच लक्षात ठेवले पाहिजे. माझ्या माहीतीनुसार जगात इतक्या भाषा नसतील तीतक्या भाषा भारतात आहे त्या शिकाव्यात. परंतु मातृभाषेचा व राष्ट्रभाषेचा विसर पडणार नाही याचीही काळजी व जबाबदारी सर्वांनीच घ्यावी.जगात भारत असा देश आहे की या ठिकाणी देव-दानव, साधु-संत, थोर महात्मे, थोर पुरुष, राजे-महाराजे, क्रांतीकारी,थोरविचारवंत इत्यादींच्या मंथनातून हा देश घडलेला आहे. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाच्या व्यक्तीला भारतीय संस्कृती भारावते आणि त्याचा आनंद सुध्दा घेतात. त्यामुळेच आपल्या पुर्वजांनी हिंदी भाषा सरळ,सोपी व लवचिक बनवीली जेनेकरून ती सर्वान समजायला सोपी जाईल. हिंदी या



शब्दात बरंच काही लपलेलं आहे.हिंदी पासुन हिंदुस्थानात, हिंदव स्वराज्य, जय हिंद, आझाद हिंद सेना असे अनेक म हत्वपूर्ण उर्जा देणारे आणि क्रांतिकारी शब्दाशी हिंदीशी निगडित असुन जवळचे नाते आहे. ते सर्वानीच जपले पाहिजे, भारताला हिंदी व मातृभाषा ही आपल्या पुर्वजांनी दिलेली संजीवनी आहे. कारण यातुनच देवान-घेवान व संस्कृतीचे जतन होत असते.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# कायद्यापुढे मॅन पावर चालतो, ना मनी पावर चालतो

ज्या घरामध्ये भरपूर युवकांची, तरुणांची आणि वयस्कर माणसांची संख्या आहे, ज्यांच्या घरातील बहुतांश सदस्य शासकीय व निम शासकीय पदावर विराजमान आहेत, भरपूर पगारीचे हक्कदार आहेत. त्यांच्याकडे भरपूर जम ीन जुमला तसेच गाडी व बंगला आहे. म्हणून अशा श्रीमंत व मॅन पावर असणाऱ्या म्हणजेच पैशाने व जनशक्तीने मोठ्या असणाऱ्या घराच्या नादी लागायला गावातील माणसे घाबरतात आणि त्यांच्यासोबत वादविवाद करायला टाळतात.

गावातील कोणत्याच माणसाची त्यांच्या वाटेला जायची हिंमत होत नाही. अशा सर्व बाजूंनी म्हणजेच साम, दाम, दंड, भेद यांनी भक्कम व मजबूत असणाऱ्या घराच्या नादी लागणे म्हणजे स्वतःचा पराभव करून घेण्यासारखे आहे. असे बहुतांश लोकांचे धोरण झालेले आहे. म्हणून आजकालची माणसे मॅन पावर व मनी पावर बघूनच भांडण तंटे करायला निघतात. पैशाने व जनशक्तीने समोरची पार्टी म जबूत व भक्कम असेल तर माणसे माघार घेणेच पसंत करतात. कारण त्यांना असे वाटते की, आपण जर अशा धनदांडग्या व श्रीमंत घराच्या नादी लागलो तर आपला पराभव निश्चितच आहे. आपण पोलीस स्टेशन मध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा जरी नोंद केला तरी समोरची पार्टी पैशाच्या जोरावर अटकपूर्व जामीन घेऊन सुटते. त्यांच्याकडे एकतर जनशक्ती असल्याम ुळे बेदम मार खाऊन पराभव पत्करावा लागतो. कारण आजकाल ज्यांच्याकडे मॅनपावर व मनी पावर आहे त्यांचाच विजय आहे. असे आज कालच्या लोकांचे ठाम मत झाले आहे. म्हणून आजकाल ज्या घरामध्ये धनशक्ती व जनशक्तीची सांगड आहे, त्याच घराचा दरारा गावामध्ये व समाजामध्ये आहे. पण मित्रहो ज्या घरांमध्ये जनशक्ती व धनशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तुम्ही त्या घराला जर घाबरत असाल तर तुम्ही खरंच शिक्षण शिकून न शिकल्यासारखे आहात, असेच म्हणावे लागेल. तुम्ही एवढे शिकूनही जर तुम्हाला भारतीय संविधानाचा व कायद्याचा अभ्यास नसेल तर मग तुमच्या त्या शिक्षणाला काय चुलीत घालायचे आहे? आपला भारत देश भारतीय संविधानावर चालतो. ज्याला भारतीय संविधानाचा व कायद्याचा परिपूर्ण अभ्यास आहे आणि जो भारतीय संविधान पूर्णपणे जाणतो तो कितीही मोठा वाघ असू द्या किंवा कितीही मोठा पहिलवान असू द्या, त्याला जराही न घाबरता त्याच्यासोबत कायदेशीर लढाई लढतो. ज्या माणसांना कायद्याचे नॉलेज नाही, ज्यांना कायदा म्हणजे काय आहे? हे अजूनही कळाले नाही. असे लोक मॅन पावर व मनी पावर असणाऱ्या धनशक्ती व जनशक्तीला घाबरतात. त्यांना कायद्याचे परिपूर्ण नॉलेज नसल्यामुळे आणि कायद्यातील एकंदरीत कलमा माहित नसल्यामुळे ते अशा धनदांडग्या लोकांच्या विरोधात केस करायला घाबरतात. त्यांना वाटत असते की, हे आपल्याला नंतर मारतील, गावात फिरणे व जगणे मुश्किल करतील असे त्यांना वाटत असते. ही त्यांची चुकी नसून त्यांच्या अज्ञानाची व त्यांच्या अल्पशिक्षणाची चुकी आहे. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कारण शिक्षण शिकलेल्या माणसाला कायद्याचा थोडातरी अभ्यास असतोच. आणि त्या व्यक्तीच्या मागे भलेही मनी पावर किंवा मॅन पावर जरी नसला तरी ते पोलीस स्टेशनला, कोर्टाला व पेशा करायला कधीच घाबरत नाहीत. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत असेल, त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत असेल तर ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कोर्टात कायदेशीर लढायला लागतात आणि आरोपीला शिक्षा देण्यास भाग पाडतात. समोरच्या पार्टीकडे कितीही पैसा असू द्या पण फिर्यादी जर खंबीर व संविधानाचा अभ्यासक असेल आणि त्याला कायदा कानून माहीत असेल तर तो या लढाईत जिंकल्याशिवाय राहत नाही. कारण कायद्यापुढे ना पैसा कामाला येतो ना माणसे कामाला येतात. न्यायालयात न्यायाधीश भारतीय संविधानानुसार आरोपीला शिक्षा व अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय देऊन निर्दोष सुटका केली जाते. कोर्टात व न्यायालयात पैसा कामाला येतो ना वशिला. आपण जाणून आहोत की, कायद्याच्या कचाट्यात अडकलेले मोठमोठे महारथी जसे की, सलमान खान, संजूबाबा, अजय देवगन, आसाराम बापू आणि इतर अनेक मोठ्या हस्ती तसेच मोठमोठे राजकारणी कोट्याधीश व अब्जाधीश असून सुद्धा त्यांना जेलची हवा खावी लागत आहे. कायद्यापुढे पैसा कामाला येत असता तर ते पैशाच्या जोरावर कधीच सुटले असते परंतु कायद्यापुढे ना पैसा चालतो ना माणसे चालतात. भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे ना धनशक्ती होती ना जनशक्ती होती, त्यांना पदोपदी जातीयतेचे विखारी चटके सहन करावे लागले. महार जातीचा असल्यामुळे त्यांचा अम ानुष छळ केला गेला. काही समाज वगळता अख्खा देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब डगमगले नाहीत, जराही खचले नाहीत किंवा त्यांना घाबरून पळाले नाहीत. नित्यनेमाने व सातत्याने आपले काम करतच राहिले. बाबासाहेबांना ना भावकी होती ना त्यांच्याकडे मुबलक पैसा होता. सगळा समाज बाबासाहेबांच्या विरोधात असताना सुद्धा बाबासाहेब इथल्या मनुवादी, जातीवादी व सनातनी विचारधारेच्या लोकांना कायद्याचा दणका देऊन समतावादी व मानवतावादी जीवन जगायला शिकवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकटेच होते आणि निम्म्याहून अधिक देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब जराही डळमळले नाहीत किंवा ध्येयापासून विचलित झाले नाहीत. मनुवादी, जातीवादी व धर्मांध लोकांच्या छाताडावर पाय देऊन या देशात सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून या देशाला जगात आदर्श व महासत्ता बनवले आहे.

बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७१५६६१

# नेपाळ सारखा उद्रेक भारतात झाला तर..?

नेपाळमध्ये भ्रष्टाचार आणि बेरोजगारीने त्रस्त झालेली जनता जेव्हा रस्त्यावर उतरते तेव्हा किमान पंचवीस वर्षेतरी देश पिछाडीवर जातो त्याचे रक्त गोठवणारे, मती गुंग करणारे पराकोटीचे ज्वलंत रक्तलांछित दृश्य नेपाळच्या हिंदूसंस्कृती असलेल्या भूमीला भ्रष्ट सत्ताधाऱ्यांच्या कुकर्माची फळे जगभरात पाहायला मिळाली.घर,सरकारी इमारती जाळण्यासहीत नामवंत राजे,मंत्री,नेते, कुटुंब,सरकारी अधिकारी व किड्यामुंग्यासारखी माणसे निघृणपणे मारली गेली.सत्ता निर्दयपणे उलथवून टाकण्यात आली असाच काहीसा प्रकार बांगला देश,श्रीलंका,म्यानम ार,पाकिस्तान सारख्या लहान देशात घडला.उठाव झाला तो समर्थनीय नसला तरी त्याला कारणीभूत भ्रष्टाचारी सरकारच आहे.मिळेल तितके ओरबाडायचे,स्विच बँक व परदेशात आपले आर्थिक स्थैर्य निर्माण करायचे हा प्रकार आपल्या देशातील उद्योगपती,भ्रष्टाचारी नेते ह्यांनी सुरूच ठेवला आहे त्याला पायबंद घातला गेला नाही तर भारत सारख्या मोठ्या देशात सुद्धा हिंसक पद्धतीचे प्रकार होऊ शकतात व ते आवाक्यात ठेवणे कठीण जाऊ शकते. आपल्या देशात कायदा सुव्यवस्था,सुरक्षा राखायची व लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर सीबीआय. ईडी लाचलुचपत,आयकर खात्याने कोणाच्याही दबावाला बळी न पडता कायद्याने व संविधानाने जे कर्तव्य बजावण्याचे अधिकार दिले आहेत त्याचा राष्ट्रहिताच्या विचार करून जेव्हडे भ्रष्ट मंत्री,नेते,सरकारी अधिकारी उद्योगपती आहेत त्यांच्यवर धाडी टाकून अटक करावी त्यांचे कुटुंबीय,आप्त मित्रमंडळी व संशयित लोकांचे पासपोर्ट,देशातील,तसेच परदेशी बँक खाते सील करावे.चार्टर विमान,हेलकॉप्टर जप्त करावे.त्यांची शारीरिक यथेच्च धुलाई करून नो बेल करून जेलमध्ये टाकावे.छोट्या देशातला हिंसक उद्रेक पाहता त्यातून बोध घेतला पाहिजे. हि परिस्थिती आपल्यावर येऊ नये, जनतेने घरदार जाळत आपल्याला कुत्र्यासारखे तुडवून ठार मारू नये असे वाटत असेल सरकारी यंत्रणेने कठोर पाऊले उचलून येणाऱ्या अंधाधुंद संकटांची चाहूल पाहता व नियतीने संकेत दिलेत त्याचा गांभीर्याने विचार करून लोकशाहीचे रक्षण करणारे निर्णय घेऊन देशाचे व निष्पाप जनतेचे रक्षण करावे. अन्यथा.

**यशवंत चव्हाण सीबीडी,**
**बेलापूर**
**मो.९९२०७७६२७७**

# गल्हाटी धरण भरले; धरणाच्या परिसरातील पाण्याचा प्रश्न मिटला

**धाकलगांव । प्रतिनिधी** - अंबड तालुक्यातील शहापूर येथिल गल्हाटी धरण पूर्णपणे भरून सांटा उलथण्याच्या स्थितीत असून, त्यामुळे परिसरातील शेतकरी व गावकरी आनंदित झाले आहेत. अनेक वर्षांपासून धरणाच्या पाण्याच्या अभावामुळे शेतीला व पिण्याच्या पाण्याला मोठा प्रश्न निर्माण झाला होता.



या पावसाळ्यात झालेल्या सातत्यपूर्ण पावसामुळे धरणाचा जलसंचय संपूर्ण क्षम तेने भरून गेल्याने धरण क्षेत्राच्या भागातील शेतकरी आता शेतीसाठी पाण्याची हमी मिळवू शकणार आहेत.

यामुळे कापूस, तुर,गव्हू,ऊसाचे व इतर पिकांचे योग्य प्रमाणात उत्पादन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

त्याचबरोबर, धरणाच्या परिसरातील गावातील पिण्याच्या पाण्याची प्रश्न मिटणार आहे.

# जिल्हा बँकेची ४२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** बँकेच्या बँकेची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ४२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा १४ सप्टेंबर रोजी बँकेच्या जालना येथील बँकेच्या सभागृहात बँकेचे अध्यक्ष सतिशराव टोपे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. सभेत सर्वप्रथम बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी जिल्हयातील उपस्थित सर्व मान्यवर, विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी यांचे स्वागत केले.

सभेच्या कामकाजापुर्वी सभागृहात अहवाल वर्षातील दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यानंतर वार्षीक सभेच्या कामकाजास सुरुवात होऊन बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी विषय सुचीनुसार विषयांचे वाचन केले व सभागृहात उपस्थित सभासदांनी सदरील विषयांस टाळयांच्या गजरात सर्वानुमते मंजुरी दिली. यानंतर मार्च २०२५ अखेर जिल्ह्यातील ज्या वि.का. से. संस्थांनी बँक कर्जाची १०० टक्के कर्ज वसुली केलेली आहे. अशा ५९ वि.का. से. संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन व गटसचिव यांना वार्षीक सभेचे मार्गदर्शक माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, बँकेचे जेष्ठ संचालक माजी आमदार अरविंद चव्हाण तसेच बँकेचे संचालक मंडळातील सदस्य यांचे हस्ते 'गौरव प्रमाणपत्र' देऊन संस्थेच्या कामकाजास गौरविण्यात आले.

यानंतर बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी बँकेच्या वार्षीक सभेचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे स्वागत केले. तसेच बँकेचे उपाध्यक्ष भिमराव जावळे यांनी बँकेचे संचालक तथा महाराष्ट्र राज्य पंचायत समितीचे अध्यक्ष विद्यमान आमदार संतोष दानवे यांचे स्वागत केले. बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे यांनी अध्यक्षीय भाषणात अहवाल वर्षात बँकेच्या आर्थिक स्थितीमधील विविध बाबींत झालेल्या प्रगतीची माहिती सभागृहात सांगितली. बँकेने बँकेच्या सर्व

खातेदारांना मिस कॉल मोबाईल क्रमांकाद्वारे खात्यावरील शिल्लक जमा रक्कमेचा तपशिल मिळविणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तसेच बँकेच्या सीबीएस नेटवर्क मध्ये सायबर सेक्युरिटी ऑपरेशन-सेंटरच्या सुरक्षात्मक व नियंत्रणात्मक बाबींची कार्य अंमलबजावणी करीत आहे.

यामुळे बँकेच्या खातेदारांची बँकेकडील खाती सायबर हल्लयापासुन 'सायबर सुरक्षित ' आहेत, तसेच बँकेच्या सर्व शाखांच्या राऊटरमध्ये 'फायरवॉल' या सुरक्षात्मक उपकरणाद्वारे बँकेच्या सीबीएस नेटवर्क मध्ये ' बँकेचे व्यवहार करणेचे अधिकार असलेले बँकेचे अधिकृत कर्मचारी, अधिकारी, बँकिंग सॉफ्टवेअर, नेटवर्क तंत्रज्ञ यांच्या व्यतिरिक्त इतर, अनोळखी, ओपन इंटरनेट ई. यांना पुर्णतः शिरकाव प्रतिबंधीत केलेला आहे, अशी सभेस माहिती देऊन बँकेच्या आर्थिक प्रगती बाबतची सभेस माहिती दिली. यात बँकेस सन २०२५ अखेर ढोबळ नफा रु.१७.१५ कोटी झालेला असून निव्वळ नफा रु.८.६७ कोटी झालेला आहे. बँकेस गत १० वर्षापासून सतत 'ब' ऑडीट वर्ग प्राप्त करीत आहे, तर नाबार्ड तपासणीमध्ये सन २०१९ पासून 'ब+' वर्ग प्राप्त होत आहे.बँकेस सी.आर.ए.आर. चे प्रमाण ९ टक्के आवश्यक आहे. तर सन

२०२५ मध्ये १९.९७ टक्के हे प्रमाणराखलेले आहे. बँकेचे नेटवर्थ सन २०२४ मध्ये रु.६२.१८ कोटी होते. यामध्ये रु.२१.४४ कोटीने वाढ होऊन सन २०२५ अखेर रु.८३.६२ कोटी झाले आहे. सन २०२४ मध्ये बँकेचा संचित तोटा रु.६.६० कोटी होता, तर सन २०२५ अखेर संचित तोटा 'निरंक' होऊन बँकेस निव्वळ नफा रु.२.०७ कोटी झालेला आहे. बँकेच्या ठेवी सन २०२४ मध्ये रु.५१६.३५ कोटी होत्या तर सन २०२५ अखेर रु.७२.१३ कोटीने वाढ होऊन बँकेच्या एकुण ठेवी रु.५८८.४८ कोटी पर्यंत वाढलेल्या आहेत. बँकेची वसुली सन २०२५ अखेर रु.४०.०० टक्के आहे. सन २०२४ मध्ये बँकेची गुंतवणुक रु.२२९.९६ कोटी होती. तर सन २०२५ अखेर रु.३०५.०८ कोटी आहे. बँकेच्या गुंतवणुकी मध्ये रु.७५.१२ कोटीने वाढ झालेली आहे. बँकेस प्रैंटीयर को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन या देश पातळीवरील

संस्थेमार्फत बँकेस सलग ६ वर्षापासून ॲवार्ड (पारितोषीके) प्राप्त होत आहे. सन २०२५ मध्ये बँकेस नुकतेच 'लिडरशिप अवार्ड- हेड ऑफ द आय.टी.' व ' बेस्ट पेमेंट ट्रान्सफॉर्मेशन ' या क्षेत्र मध्ये बॅकेच्य उल्लेखनिय कामगिरी बद्यल बॅकेची अवॉर्ड (पारितोषका) साठी निवड झालेली आहे. आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे बँक सलग ५ वर्षापासून नियमित कर्ज परतफेड करणार्या शेतकरी सभासदास १०ज्ञ् वाढीव कर्ज वितरण करीत आहे. बँकेच्या खातेदारांना त्यांच्या बचत खात्यातील जमा शिल्लक रक्कमेचा तपशिल त्वरीत मिळण्यासाठी मिस कॉल सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. बँकेने सीबीएस नेटवर्क मध्ये(सी-सॉक) सायबर सेक्युरिटी ऑपरेशन सेंटरद्वारे बँकेच्या ग्राहकांना सायबर सुरक्षा सेवा पुरवित आहे. बँकेकडे गत ३५ वर्षापासुन संचित असलेला तोटा बँकेने मार्च २०२५ अखेर निरंक केलेला आहे.

तसेच सन २०२५-२६ करीता बँकेकडे रु. २.०७ कोटी नफा शिल्ल आहे. गत प्रदिर्घ काळानंतर बँक निव्वळ नफयात आली आहे. बँकेचे विद्यमान संचालक मंडळांने

वेळोवेळी घेतलेले सकारात्मक निर्णस व सन २०१० पासुन कै. अंकुशराव टोपे साहेब यांनी घालुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व खर्चात काटकसर तसेच बँकेच्या उत्पन्नात भरीव वाढ करुन बॅक निव्वळ नफयात आणली आहे व यापुढे बॅक सतत नफ्यात राहील, यासाठी बँकेचे संचालक मंडळ प्रयत्नशिल आहे, अशी सभेस माहिती देऊन बँकेचे ग्राहक, खातेदार व ठेवीदार यांच्यासाठी बँकेमार्फत अंमलात आणल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची सभेस माहिती दिली.

बँकेने शेतकरी जनता अपघात विमा :- बँकेने सन २०२४ मध्ये जिल्हयातील चालुबाकी कर्जदार शेतकर्यांसाठी नाममात्र विमा हप्त्यात एक वर्ष कालावधीसाठी रु.२.०० लाखांचा अपघाती विमा कंपनी मार्फत उपलब्ध करुन दिलेला आहे. सन २०२५-२६ च्या हंगामात बँकेने या योजनेत जिल्हयातील जवळपास ४७,९६५ नियमित कर्ज परतफेड करणार्या चालुबाकी कर्जदार शेतकरी सभासदांचा विमा उतरविण्यात आलेला आहे. बँकेने शेतकर्यांना अपघाती विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना :- महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण ' योजने अंतर्गत जिल्हयातील शहरी, ग्रामिण भागातील महिलांचे बचत खाते शुन्य बॅलन्स मध्ये उघडण्याचा निर्णय सर्वप्रथम जालना बँकेच्या संचालक मंडळाने घेऊन तशी सुविधा जिल्हयातील महिला भगिनींना सर्व शाखां मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. यांस महिला भगिनीं मार्फत मोठा प्रतिसाद मिळत आहे. या योजने अंतर्गत बँकेच्या ६३,५०८ लाभार्थी महिला खातेदारांच्या खाती रक्कम जमा करण्यात आली आहे. बॅकेत ए.बी.बी. (एनी बँच बँकिंग) सुविधेस गतीमान करण्यात आलेः- बँकेचे खातेदार आता आपल्या मुळ शाखेतील खात्यावर बँकेच्या ६४ शाखांपैकी

कोणत्याही शाखेतुन रक्कमेचा भरणा अथवा रक्कम काढण्याचा कोणताही व्यवहार करु शकतात. तसेच सर्व शाखां मधुन आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. ची सुविधा

उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बँकेच्या खातेदारांना त्यांच्या खात्यावरील नांवे अथवा जमा रक्कमेच्या व्यवहाराचा तपशिल त्यांच्या मोबाईलवर एस.एम. एस.द्वारे दिला जात आहे. बैंक खातेदारांना त्यांच्या रक्कमा इतर बँकांतील खातेदारांना पाठविणेसाठी शाखास्तरावर ' आय.एम. पी.एस.' (ईमिजियट मोबाईल पेमेंट सिस्टीम) बँच ट्रान्झक्शन सुविधा उपलब्ध करुन देत आहे.बँकेचा खातेदार त्याच्या मागणीनुसार बँकेच्या शाखेद्वारे इतर बँकांचे खातेदार यांच्या खात्यात रक्कमा वर्ग करणेसाठी बँक सीबीएस सिस्टीम मध्ये 'आय.एम.पी.एस. ' बँच ट्रान्इक्शन सुविधा बॅकेच्या सर्व शाखास्तरावर उपलब्ध करुन देत आहे, ज्यामुळे बँकेच्या खातेदारांना त्यांच्या रक्कमा

पाठविणेसाठी 'आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी.' साठी इतर व राष्ट्रीयकृत बँकांत जाण्याची गरज राहणार नाही. बँकेच्या शाखास्तरावरुन खातेदाराच्या मागणी नुसार त्यांच्या रक्कमा इतर बँकांतील खातेदारांना सरळ जमा करण्यात येतील. बँकेतील प्रत्येक खातेदाराच्या बँकेतील रु.५.०० लाखा पर्यतच्या कोणत्याही प्रकारच्या ठेवी विमा संरक्षणाद्वारे सुरक्षित




:- बॅकेतील खातेदारांच्या सर्वप्रकारच्या ठेवीचा रु.५.०० लाखा पर्यतच्या ठेव रक्कमेचा बँके मार्फत विमा काढण्यात आला आहे. यापोटी बँक ही विमा कंपनीस रु.७०.०० लाख विमा हप्ता विमा कंपनीस भरणा करीत आहे. सदरील ठेव विमा संरक्षणामुळे बँकेकडील ठेव रक्कमे बाबत बँकेचे ठेवीदार आश्वस्त असुन त्यांची ठेव रक्कम विम्याने सुरक्षित आहे.बॅकेचा गत ३४ वर्षा पासुनचा सततचा संचित असलेला तोटा मार्च २०२५ अखेर निरंक झाला आहे.:- बँकेस सन १९९१ पासुन म्हणजे जवळपास गत ३५ वर्षापासुन बँकेकडे सततचा संचित असलेला तोटा बॅक मार्च २०२५ अखेर संपुर्ण निरंक केलेला आहे. सन २०२५-२६ साठी रु.०२.०७कोटी नफा शिल्लक आहे. तसेच यापुढे यापुढील कालावधीत बॅक कायम नफयात राहील किंबहुना नफ्यात विक्रमी वाढ करील, असे प्रयत्न बँकेच्या संचालक मंडळाद्वारे करण्यात येत आहेत. बँकेने कोअर बँकीग सोल्युशन (सीबीएस) संगणकीय प्रणालीद्वारे ग्राहकांना अनेकविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. बँकेस ठेवी, अनुदान, कर्ज अथवा ईतर मार्गाने मिळणारा निधी बॅक जिल्हयातील शेतकरी सभासदांच्या आर्थिक गरजा पुर्ण करणे व जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी उपयोगात आणीत आहे. करीता जिल्हयातील ठेवीदार, खातेदार व कर्जदार सभासदांनी आपले सर्व प्रकारचे व्यवहार जिल्हा बँकेमार्फत करुन आपल्या ठेवी जिल्हा बँकेतच ठेवाव्यात, आपल्या कडील कर्जाची नियमित परतफेड करुन व्याज परतावा सवलतीचा लाभ घेणे, खातेदाराची केवायसी पुर्तता, कर्जदारांची अपुर्ण भागधारणेची

पुर्तता करणे क्रमप्राप्त आहे. करीता सर्व सभासद बंधूनी बँकेस सहकार्य करावे, अशी विनंती बँकेचे अध्यक्षांनी उपस्थित सर्व सदस्यांना केली आहे.

बँकेच्या ४२ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेस माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन करतांना बँकेच्या आर्थिक प्रगती बाबत सांगतांना बँक ही मोठ्या आर्थिक अडचणीच्या काळातुन वाटचाल करीत बँक स्वंयपुर्ण होत असल्या बाबत समाधान व्यक्त करुन तसेच सहकारी संस्थांनी बँकेच्या कर्जवसुलीस प्राधान्य देऊन वाढ करावी तरच बॅक देखील संस्थांना कर्जवाटपात वाढ देऊ शकेल याबाबतचे सभेत अवाहन केले आहे. तसेच जिल्हयातील सहकारी संस्था, सधन शेतकरी, व्यापारी व सर्व सामान्य शेतकर्यांनी बँकेकडे आपल्या ठेवी ठेऊन बँकेच्या प्रगतीमधुन जिल्हयातील शेती व्यवसाय, शेतकर्यांचा विकास साधावा, असेही त्यांनी सभेत सांगितले आहे. तसेच केंद्र शासन देशातील सहकारी संस्थांना आर्थिक बळकटी देणेसाठी अंमलात आणीत असलेल्या विविध योजनांची त्यांनी सभेत माहिती दिली, व प्रथम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी आपली आर्थिक परिस्थिती सुदृढ करावी, असे सहकारी संस्थांना अवाहन केले आहे.

बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी बँकेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानुन बँकेचे अध्यक्ष यांचे परवानगीने सदरील सभा संपल्याचे जाहिर केले. बॅकेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेस बँकेचे उपाध्यक्ष भिमराव जावळे, तसेच संचालक मंडळाचे सदस्य विद्यमान आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे पंचायत राज्य समितीचे अध्यक्ष संतोषराव दानवे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, माजी आ. कैलाश गोरंट्याल, माजी आ. शिवाजीराव चोथे,शालिकग्राम म्हस्के, भाऊसाहेब जाधव, रितेश कामड, स. जहीर स.नजीर, शितल कुचे,मनिषा उढाण, निर्मला मरकड, सुनिता खरात हे उपस्थित होते. तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना,सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जालना हे सभेस उपस्थित होते.

बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख, सरव्यवस्थापक सुरेश जाधव, व्यवस्थापक दादाराव राऊत व बँकेचे अधिकारी व कर्मचारी सभेस उपस्थित होते. सभेचे स्वागत व सुत्रसंचालन बँकेचे सरव्यवस्थापक सुरेश जाधव यांनी केले.

तसेच बँकेचे माजी अध्यक्ष मनोज मरकड,माजी संचालक अशोक लोंढे, रावसाहेब दाभाडे, प्रदिपराव मरकड, सिध्दीविनायक मुळे,शकुंतलाताई कदम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तसेच समर्थ सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष उत्तम पवार, जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेश चव्हाण,अच्युतराव कदम, राजेश कोल्हे, राम सावंत, अच्युतराव कदम, दत्तात्र्य तौर, शरदराव टोपे,अरुणराव कळकटे, प्रभाकर इंगळे, युवा सेनेचे अभिमन्यु खोतकर, तात्यासाहेब चिमणे,बालासाहेब शिंदे, बद्रीभाऊ पठाडे, सतिशराव होंडे,रमेश पैठणे, नानाभाऊ उगले, तसेच समर्थ सहकारी बँकेचे महाव्यवस्थापक विजय कनुजे यांची सभेस उपस्थिती होती. एकंदरीत आज १४ सप्टेंबर रोजी जिल्हा बँकेची ४२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली.

---

## जालन्यात शिवसेना महिला आघाडीचा 'माझं कुकूं माझा देश' आंदोलन



**जालना । प्रतिनिधी -** देशात पहेलगाम येथील निरापराध पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार करुन अनेक भगिनींच्या कपळावरील कुंकू पुसरणार्या व अतिरेक्यांना पोसणार्या देशासोबत केंद्र शासनाने नुकतीच क्रिकेट सामन्यांना परवानगी दिली. यावरुन मोंदी सरकारला पहेलगाम येथील भगिनींच्या कुंकूवाचा विसर पडल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मोदी सरकारच्या विरोधात जालन्यात शिवसेना महिला आघाडीच्या वतीने ऋमाझं कुकूं माझा देश' हे आंदोलन करुन कुंकूवांच्या पेट्या जमाकरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठविण्यात आल्या.

आजचे आंदोलन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तर महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगल मेटकर यांच्या नेतृत्वात शहरातील गांधीचमन येथे करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या वतीने केंद्र सरकार व मोदी विरोधात घोषणाबाजी केली व मोंदी सरकारने आपला निर्णय मागे घ्यावा अशी जोरदार मागणी केली.

यावेळी माजी नगरसेविका गंगुबाई वानखेडे, मंजुषा घायाळ, स्वाती खांडेभराड, द्वारकाबाई तोंडुळे, सुशीला लवटे, सीताबाई राऊत, शिवकन्या राऊत, लक्ष्मीबाई राऊत, अनुसया काळे, माधुरी वाघमारे, वर्षा नागवे, पार्वती वाघमारे, नंदा नागवे, शकुंतला खांडेभराड, मिना कंकाळ, अंजना घोडके, आशा लांबे, माधुरी टापरे, संगीता पवार, सखुबाई पवार, जिजाबाई हरणे, कांताबाई सोळुंके, लक्ष्मीबाई काटकर, आशा सुरुशे, आशाबाई आगलावे, सरस्वती मिरकर, कलाबाई दसपुते, शशिकला निहाळ, राधाबाई मते, राणी लांबे, रुख्मिणी आगलावे, ज्योती चाकुटे यांच्यासह आदी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

### मराठा मावळा संघटनेची जालना येथे बैठक

## शासन दरबारी मागण्यांसाठी तीव्र आंदोलनाचा संस्थापक अध्यक्ष माणिकराव शिंदे यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** मराठा मावळा संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक जालना शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आज रविवार रोजी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिकराव शिंदे होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना माणिकराव शिंदे यांनी सांगितले की, मराठा मावळा संघटनेच्या माध्यमातून शेतकरी, युवक व सर्वसामान्य घटकांचे प्रश्न शासन दरबारी ठामपणे मांडले जातील. जर शासनाने मागण्या तातडीने पूर्ण केल्या नाहीत, तर संघटनेमार्फत राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. शिंदे यांनी पुढे बोलताना संघटनेचे ध्येयधोरण स्पष्ट केले. त्यांनी मागणी केली की, मुंबई




येथील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक तातडीने उभारण्यात यावे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी तात्काळ करावी. शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत वस्तीगृह उभारले जावेत. प्रत्येक तालुका व जिल्ह्यातील कमिटींनी गोरगरिबांच्या मुलांसाठी वस्तीगृहांची उभारणी करावी. या मागण्याचे निवेदन शासन दरबारी देऊन या मागण्या मान्य करण्यासाठी शासनाला विनंती करण्यात येणार आहे जर या मागण्या पूर्ण न झाल्यास व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

बैठकीदरम्यान जिल्हा व शहर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या देखील जाहीर करण्यात आल्या. त्यात जिल्हाध्यक्ष : सतीश घारे, जिल्हा उपाध्यक्ष : रमेश तुपे, शहर जिल्हाध्यक्ष : योगेश वाय., शहर उपजिल्हाध्यक्ष : तानाजी गायके (भोकरदन तालुका अध्यक्ष), संपर्कप्रमुख गंगाधर गायके आदींची निवड करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये महाराष्ट्र संघटक भरत कदम, छत्रपती संभाजीनगर शहर प्रमुख संजय गायके, रामदास हांडके, छत्रपती संभाजीनगर महिला जिल्हाध्यक्षा सुनिता, संघटक शोभाताई जाधव, कार्याध्यक्षा पूजाताई तुपे यांचा समावेश होता. मराठा मावळा संघटनेची ही बैठक अत्यंत उत्साहपूर्ण व जाहीरनाम्यासारखी ठरली. संघटनेच्या मागण्या लवकर मान्य झाल्या नाहीत तर येत्या काळात महाराष्ट्रभर जनआंदोलन उभारले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत या बैठकीतून देण्यात आले.

---

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांच्या शुभ हस्ते बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता हुतात्मा स्मारक, जालना येथे होणार आहे. तत्पुर्वी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. तरी सर्व शासकीय, निमशासकीय, सहकारी संस्था आदि कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोशाखासह ध्वजारोहणास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

## आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी नागरिकांना कालमर्यादेत सेवा द्यावी

**जालना -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली सद्यस्थितीत जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी विहीत कालमर्यादेत नागरिकांना सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व आपले सरकार केंद्र चालकांच्या आयोजित दुरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या बैठकीत उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिले.

# आविष्कार स्पर्धेत मोहिनी गोसावी यांचा संघर्षमय यश



**धाकलगांव । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व लालबहादुर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतूर, जि. जालना यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच जिल्हास्तरीय आविष्कार-२०२५ स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर येथील तृतीय वर्षाच्या कला शाखेतील विद्यार्थिनी मोहिनी अरुण गोसावी हिने डिजिटल इंडिया मध्ये ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावर प्रकल्प सादर केला. मोहिनींनी त्यांच्या संघर्षमय परिश्रमातून तृतीय क्रमांक प्राप्त केला असून, आता विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मोहिनी तीन महिन्यांच्या बाळाची आई असूनही घरच्या जबाबदाऱ्या आणि शिक्षण यामध्ये समतोल साधून प्रकल्पाची तयारी केली. रात्री उशिरापर्यंत अभ्यास, बाळाची काळजी, घरकाम आणि कॉलेजची तयारी करत त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या यशामध्ये सासूबाईंचा, पतींचा व कुटुंबाचा भक्कम पाठिंबा मोलाचा ठरला.

डॉ. वैद्य सरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रकल्प सादर केला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. खान एस.ए., समन्वयक डॉ. वैद्य, प्रा. अशोक गायकवाड, प्रा. शिवाजी गायके, श्री. विक्रांत दावकर, श्री. यादव भगवान व संपूर्ण प्राध्यापक कर्मचारी वर्ग यांनी मोहिनीच्या यशाचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# सांबा उपविभाग यांनी राज्य मार्गावर २५१५ हेड वापरून ३३ लाखाचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील ३०५४ या हेड मधील झालेल्या बोगस कामाची तक्रार देऊन देखील कुठल्याही प्रकारची संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी झालेली नाही. विशेष म्हणजे राज्य मार्गावर सां बा उपविभाग परतूर यांनी २५१५ चे हेड मध्ये जे किलोमीटर होते तेच किलोमीटर वरती कामे दाखवून २५१५ ग्रामविकास वरून ३३ लाख रुपये कामे न करता उचलण्यात आले आहेत.या संदर्भात वारंवार आपल्या कार्यालयात पत्र व्यवहार केलेला आहे.या सोबत सर्व तांत्रिक मान्यतेची प्रत जोडलेली आहे.रा मा २५३ ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा - ३६ , कि मी ०/००ते०४/०० रस्त्याची सुधारणा करणे ता.परतूर जि.जालना रुपये ०२,९९,४३०/- पांडेपोखरी ते आसनगाव रा मा -६१ कोकाटे, हादगाव, पिंपरी, धामणगाव, सावरगाव रस्ता प्रजिमा -३० किमी ०/०० ते ०४/५००(संकिर्ण किमी ०७/५०० ते ११/३५०या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९९,०८०/- दैठणा, माव,पांडेपोखरी ते रामा ६१, रस्ता प्रजिमा -४९कि.मी.०२/०० ते ४/५०० व ०९ ५००ते ११/५०० संकिर्ण कि.मी. ००/००ते ०० ते ०२/००) रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९८,७६०/- रा मा - २५३, ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा ३६ कि.मी.१७/०० ते २०/००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९६,५४०/-कुंभार पिंपळगाव रा मा -२२३,गुंज सावरगाव,संकनपुरी ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा -३१,कि.मी.२०/५०० ते २५/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९६,८६०/- रा मा-२५३, ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा -३६ कि.मी. १४/००ते१७/००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९९,०८०/- अहमदनगर ,शेगाव, पैठण,पाचोड,आंबड,पाथरी रस्ता रामा- ६१,कि.मी.२०२/०० ते २०८/००(संकिर्ण कि.मी.२०५/०० ते २०८/००) या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९६,८००/-कुंभार पिंपळगाव रामा-२२३, गुंज, सावरगाव, संकनपुरी, ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा -३१,कि.मी.१७/५०० ते २०/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,९२०/- अहमदनगर, शेगाव, पैठण, पाचोड, आंबड, पाथरी रस्ता रामा-६१,कि.मी.२०२/००ते २०८/००(संकीर्ण कि.मी.२०२/०० ते २०५/०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,७००/-पांडेपोखरी ते आसनगाव रामा-६१, कोकाटे हादगाव, पिंपरी, धामणगाव, सावरगाव, रस्ता प्रजिमा -३०, किमी ०/००ते०४/५०० संकीर्ण किमी ०४/५०० ते ०७/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९८,७००/- कुंभार पिंपळगाव रामा-२२३ ,गुंज सावरगाव , संकनपुरी, ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा -३१,कि.मी.१३/५०० ते १७/५००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,९२०/- लेखाशीर्ष २५१५ नमुद आहे.सविस्तर माहिती हि त्या त्या तांत्रिक मान्यतेनुसार त्यात स्पष्ट उल्लेख आहे.वरील विषयाची चौकशी करून २५१५हे हेड राज्य मार्गाला वापरता येते का.याची माहिती घ्यावी ग्राम विकास यांचे २५१५, हे हेड सार्वजनिक बांधकाम उपविभाग परतूर यांनी राज्य मार्गाला वापरून कामे न करता निधी उचलण्यात आलेला आहे संबंधित अधिकारी यांनी राज्य रस्त्यावर २५१५ निधी वापरल्यामुळे त्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.नसता मी विजय लोणीकर यांनी अमर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.



## बंजारा समाजाच्या मागणीला शिवसेनेचा पाठिंबा - भास्कर अंबेकर



**जालना -** मराठवाड्यातील बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गामध्ये सामावून घ्यावे या मागणीसाठी बंजारा समाजातील श्रीकांत राठोड, हरिश राठोड यांनी जालना जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. आज १४ सप्टेंबर रोजी शिवसेना (उध्दव ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी त्यांची भेट घेवून त्यांची मागणी समजवून घेत त्यांच्या न्याय मागणीला पाठिंबा दिला.जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, बंजारा समाज बांधवांच्या न्याय्य मागणीची दखल घेवून शासनाने त्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी केली.

# जालना पालिकेत स्वच्छतेऐवजी भ्रष्टाचाराचा कचरा?

## साद बिन मुबारक यांचा स्फोटक आरोप

**जालना । प्रतिनिधी -** शहराच्या स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी केला आहे. शहरातील कचरा उचलण्यासाठी वापरण्यात आलेल्या खासगी ट्रॅक्टरमध्ये मोठा घोटाळा झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. कागदावर जास्त ट्रॅक्टर दाखवून प्रत्यक्षात कमी ट्रॅक्टर वापरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



या ट्रॅक्टरपैकी काहींचा इन्शुरन्सही नसल्याचे पालिकेने लेखी स्वरूपात मान्य केले आहे. यामुळे पालिका प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघड झाला आहे. जनतेच्या पैशांचा गैरवापर होत असून, शहरात कचऱ्याचे ढीग साचलेले असताना हा घोटाळा समोर आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. साद बिन मुबारक यांनी या भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.